“डिजीटायजेशन निधी मागणी प्रस्ताव”

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक राभूअ-२०१९ /प्र.क्र. ९६ /ल-१
मंत्रलय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- ३० मार्च, २०१९

वाचा:-

१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक राभुअआका १/डिजीटायशन/निधी मागणी/ २०१९, दिनांक १८/०३/२०१९

प्रस्तावना

केंद्र शासनाच्या भूमि संसाधन व ग्रामिण विकास मंत्रालयाकडून संपुर्ण देशात डिजीटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम हि योजना सन २००८ पासून सुरु करण्यात आलेली आहे. जमिनीच्या जुन्या नकाशांचे डिजीटायजेशन करणे हा सदर योजनेतील एक भाग आहे. या करीता केंद्र शासनाकडून निधी मंजुर झालेला असून याअंतर्गत टिपण व गाव नकाशांचे डिजीटायजेशन करणे केंद्र शासनाला अभिप्रेत आहे.

सदर योजनेतंर्गत राज्यात नकाशांचे डिजिटायझेशन चे काम रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यांत सुरू असून त्यामुळे संबंधित संस्थेनां देयके अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

पुणे आणि नाशिक या जिल्हयातील टिपणांचे डिजीटायझेशनची देयके अदा करण्यासाठी सन २०१८-१९ या वित्तिय वर्षात राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (१०० % केंद्र पुरस्कृत) **त्या अंतर्गत रू.** ३६.५५ लाख, निधी वितरीत करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

१. वरीलप्रमाणे एकुण रु. ३६.५५ (अक्षरी रु. छत्तीस लाख पंचावन्न हजार फक्त) या खर्चास व निधी वितरणास मंजुरी देऊन सदर निधी महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्था, राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या स्टेट बँक आफ इंडिया पुणे येथील मुख्य शाखेतील बचत खाते क्रमांक ३२८८८७७६४०६ मध्ये जमा करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. सी १, (००) (०६) जमाबंदी आयुक्त संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमातंर्गत राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (१०० % केंद्र पुरस्कृत) **लेखाशिर्ष** २०२९ ०८०५" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजुर अनुदानातुन खर्ची टाकण्यात यावा.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांनी सदर निधी आहरीत करून महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्थेच्या बँकेच्या बचत खाते क्रमांक ३२८८८७७६४०६ मध्ये जमा करणेची त्वरीत कार्यवाही करावी. सदर निधीचे विनियोगासाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत तसेच खर्चाचा ताळमेळ महालेखापालांकडे वेळोवेळी देणेची दक्षता घ्यावी. प्रस्तुत निधीबाबत आर्थिक व भौतिक अहवाल उपयोगिता प्रमाणपत्रासह शासनास पाठवावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौ. सं. क्र. ४८८ /व्यय-१०, दिनांक ३०/०३/२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३३०२००३२०४३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2019.03.30 20:07:18 +05'30'

(डॉ. संतोष भोगले)
सहसचिव
महसूल व वन विभाग

प्रत -

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
५. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव.
६. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
७. सर्व विभागीय आयुक्त
८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

९. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.सर्व जिल्हाधिकारी.
११.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर
१३.कोषागार अधिकारी, पुणे
१४.वित्त विभाग, कार्यासन क्र. व्यय १०/अर्थसंकल्प ६, मंत्रालय, मुंबई
१५.माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती प्रसिध्दीकरीता)
१७.निवड नस्ती, ल-१.